अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ११ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३१३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## शिष्यवृत्तीच्या संख्येत मोठी घट

✔ सुराज्य/मुंबई

सरकारच्या विविध संस्थांअंतर्गत ज्या शिष्यवृत्ती दिल्या जातात, त्याच्या संख्येत मोठी घट करण्यात आली आहे. बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय अंतर्गत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये मोठी घट करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे. बार्टी संस्थेकडून आता ८६१ च्या ऐवजी २०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल, तर सारथीमधील लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या ६०० वरून ५० वर आणण्यात आली आहे.

महाज्योतीमध्ये देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये घट करण्यात आली असून ती १२०० वरून थेट ५० वर आणण्यात आली आहे. तर टीआरटीआय १४६ च्या ऐवजी १०० जणांनाच शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. सामजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये मात्र संभ्रम निर्माण झाला आहे.

**कोणत्या संस्थांची संख्या कमी**

- बार्टी ८६१ वरून २०० वर
- सारथी ६०० वरून ५० वर
- महाज्योती १२०० वरून ५० वर
- टीआरटीआय १४६ वरून १०० वर

# शिंदे गटाच्या आमदारांची 'ठोकशाही'

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील आमदारांची ठोकशाही साऱ्या महाराष्ट्राने पाहिली. आमदार प्रकाश सुर्वे यांचा मुलगा राज सुर्वे याने एका व्यापाऱ्याचे खंडणीसाठी अपहरण केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.दरम्यान जळगावमध्ये आमदार किशोर पाटील यांच्या बगलबच्च्यांनी भर चौकातच एका पत्रकाराला खाली पाडून लाथा-बुक्क्या घालून बदडले. शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीला नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. शिंदे यांनी आपल्या संयमी स्वभावातून आणि कुशल प्रशासकाच्या माध्यमातून राज्यात लौकिक प्राप्त केलेले असताना त्यांच्या शिलेदारांनी मात्र शिंदे यांच्या प्रतिमेला डाग लावण्याचा उद्योग चालवला आहे, असे दिसते. शिंदे यांचा आमदारांवर जबरदस्त वचक आहे, असे सांगितले जाते पण मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांची पक्ष संघटनेवरील पकड सैल होत चालल्याची चर्चा आहे. तेव्हा शिंदे यांना अशा उताविळ आमदारांचा वेळीच बंदोबस्त करायला हवा, अशी मागणी पक्षातून होते आहे.**



## खंडणीसाठी व्यापाऱ्याचे मुलानेच अपहरण केले



प्रकाश सुर्वेंचा मुलगा राज सुर्वे यांच्यासह दहा ते बारा जणांविरुद्ध गोरेगाव येथील वनराई पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. व्यावसायिकाच्या कार्यालयात घुसून त्याला मारहाण करत सुर्वे सह बारा जणांनी त्याचे अपहरण केल्याचा आरोप आहे. मुंबई पोलिसांनी ही कारवाई केली.

बुधवारी गोरेगाव पूर्व परिसरातून व्यापारी राजकुमार सिंह यांचे खंडणीसाठी अपहरण केल्याप्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला आहे. बंदुकीच्या धाकावर व्यापाऱ्याचे अपहरण केल्याचा आरोप आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे.

गोरेगाव येथील ग्लोबल म्युझिक जंक्शन कार्यालयात सुमारे १० ते १५ जण घुसले. म्युझिक कंपनीचे सीईओ राजकुमार सिंह यांचे अपहरण केल्याचा दावा करण्यात येत आहे. या घटनेचे एक सीसीटीव्ही कॅमेरा फूटेज सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचा दावा केला जात आहे. यामध्ये १० ते १५ जण कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत असल्याचे बोलले जाते. तर एका व्यक्तीला जबरदस्तीने सोबत नेतानाही दिसत आहे.

तक्रारदार राजकुमार सिंग यांच्या आरोपानुसार, त्यांना त्यांच्या कार्यालयातून जबरदस्तीने उचलून नेण्यात आले. पाटणा येथील मनोज मिश्रा यांना दिलेल्या व्यावसायिक कर्जाची सेटलमेंट करण्यासाठी त्यांच्यावर बंदुकीच्या जोरावर दबाव आणण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.

राजकुमार यांना आमदार प्रकाश सुर्वे यांच्या दहिसर येथील कार्यालयात नेण्यात आले, तिथे आमदारपुत्र राज सुर्वे आणि त्यांच्या साथीदारांनी सिंग यांना बंदुकीच्या जोरावर हे प्रकरण मिटवण्याची आणि त्याबद्दल कुठेही वाच्यता न करण्याची धमकी देण्यात आल्याचे वृत्त आहे.

## पत्रकाराला भर चौकात बगलबच्च्यांनी बदडले



जळगाव जिल्ह्यात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाला. या प्रकरणावरुन स्थानिक पत्रकाराने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर भाष्य करणारी बातमी केली. ही बातमी शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांना चांगलीच झोंबली. त्यांनी पत्रकार महाजन यांना फोन करून अश्लील शिवीगाळ केली. एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर त्यांच्या समर्थकांनी पत्रकार संदीप महाजन यांना मारहाण केली. आमदारांच्या समर्थकांच्या गुंडगिरीचा राज्यभरातून निषेध होतोय.

जळगाव जिल्ह्यातील भडगाव तालुक्यातील एका गावातील पीडित मुलीवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आला होता. या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी मूक मोर्चा काढण्यात आला.

पाटील यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पीडित कुटुंबाशी संवाद साधला. या विषयावर पाचोरा येथील स्थानिक पत्रकार संदीप महाजन या पत्रकाराने 'मुख्यमंत्र्यांची चमकोगिरी' या आशयाखाली बातमी प्रसारित केली होती. यावरून पाटील यांनी त्या पत्रकाराला शिविगाळ केली.

ती ऑडिओ क्लिप माझीच आहे, मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे, मी जे केले ते सत्य सांगण्याची माझ्यामध्ये हिंमत आहे, असे म्हणत 'घटने संदर्भात संबंधित पत्रकाराला गांभीर्य नसेल तर.... होय मी पत्रकाराला शिव्या दिल्या आहेत' अशी सुद्धा कबुली दिली होती. या प्रकरणावरून आमदार किशोर पाटील यांच्यावर राज्यभरातून टीका होताना पाहायला मिळत आहे.

ज्या चौकात त्यांना मारहाण झाली, त्या चौकाला संदीप महाजन यांच्या स्वातंत्र्यसैनिक वडिलांचे नाव आहे. त्याच चौकात महाजन यांना मारहाण करण्यात आली. याप्रकरणी आ. रोहित पवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. शिंदे साहेब, सत्तेची नशा अशी असते का? लोकशाही मूल्यांना, स्वातंत्र्यासाठी झिजलेल्या कुटुंबांना देखील सन्मान नसतो का? असा उद्विग्न सवाल पवार यांनी विचारला आहे.

## पंढरपूर येथे बनावट सोने देऊन १ लाखास गंडविले

✔ सुराज्य/पंढरपूर



आपल्या पत्नीचे ऑपरेशन झाले असून पैशाची गरज आहे. असे सांगून बनावट सोन्याचे दागिने देऊन १ लाख १० हजाराची फसवणूक केल्याची घटना पंढरपूर शहरात १ ऑगस्ट रोजी घडली. या प्रकरणात पंढरपूर शहरच्या पोलिसांनी सुदर्शन बंडू ढगे (वय ३५ रा. टेंभुर्णी ता . माढा) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात अरविंद अर्जुन माळी (रा. तनपुरे महाराज मठाजवळ) यांनी पोलिसात नुकतीच तक्रार दाखल केली. ते १ ऑगस्ट रोजी आपल्या घराजवळील दूध डेअरीत बसले होते. त्यावेळी त्यांच्या परिचयातील सुदर्शन ढगे हा त्यांच्याकडे आला. आणि पैशाची गरज आहे असे खोटे सांगून त्यांना ३० ग्रॅम सोन्याचे दागिने दिले. आणि त्याच्या बदल्यात १ लाख १० हजार रुपये घेऊन गेला होता.त्यानंतर माळी आणि दागिन्याची तपासणी केली असता ते बनावट असल्याचे निष्पन्न झाले.अशी नोंद पोलिसात झाली. सहायक फौजदार गोसावी पुढील तपास करीत आहेत.

## महसूल सप्ताहात सात दिवसात ९ हजार ८३५ जणांची उपस्थिती

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा प्रशासनाच्या वतीने १ ते ७ ऑगस्ट या कलावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहातील विविध कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सात दिवसात विविध कार्यक्रमात दहा हजार नागरिकांनी भेट दिली. त्यामध्ये अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली,अशी माहिती महसूल विभागाचे तहसीलदार दत्तात्रय मोहळे यांनी दिली.




महसूल विभागाच्या वतीने १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. इ- हक्क पोर्टलवर वारस नोंदी, सातबारा उताऱ्यावरील बोजे, विविध दाखले, गहाणखते यासाठी

### अनेक प्रकरणे निकाली

पहिल्याच दिवशी (१ ऑगस्ट) १९१ अर्ज दाखल झाले.

सात दिवसांत जिल्ह्यातील विविध कार्यक्रमांना नऊ हजार ८३५ जणांनी उपस्थिती दर्शवली. एकूण २ हजार ७९७ जणांनी लाभ घेतला. २४२ जणांनी सातबारा दुरुस्तीसाठी अर्ज केले. यापैकी महाराष्ट्र जमिनी कायदा कलम १५५ खाली दुरुस्तीसाठी २४२ आदेश पारित करण्यात आले.

२ ऑगस्ट रोजी युवा संवाद हा कार्यक्रम राबविण्यात आला. ३२० शाळा महाविद्यालयातील सात हजार ४९७ जणांना विविध दाखले वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास १४ हजार ६५० विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली. यापैकी चार हजार ३३७ जणांना विविध दाखले काढण्याचा लाभ घेतला.

३ ऑगस्ट रोजी पीक विम्यासाठी सातबारा व आठ अ उतारे वाटप करण्यात आले. याचा ११,८५८ जणांनी लाभ घेतला. ४ ऑगस्ट रोजी जनसंवाद या कार्यक्रमात जमिनी विषयक नोंदी अद्यावत करण्यात आल्या.

५ ऑगस्ट रोजी माजी सैनिकांसाठी ७९ ठिकाणी विविध शिबिरे घेण्यात आली. माजी सैनिकांनी ३२७ अर्ज दाखल केले. त्यापैकी १६० अर्जावर कार्यवाही करण्यात आली. ६ ऑगस्ट रोजी आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरे घेण्यात आली तर ७ ऑगस्ट रोजी समारोप कार्यक्रम झाला.

## शौचालयाच्या हौदात पडल्याने तरुणाचा मृत्यू

✔ **सोलापूर** : सार्वजनिक शौचालयाच्या पाण्याच्या हौदात पडल्याने ३५ वर्षीय तरुण मरण पावला. घटना पूर्व भागातील व्हिवीको प्रोसेस रोड लगत आज गुरुवारी सायंकाळी उघडकीस आली.

अंजन वाबण्णा गड्डम (वय ३५ रा. सरस्वती चौक, लष्कर सोलापूर) असे त्या मयताचे नाव आहे. तो अविवाहित असून मजूरी काम करायचा. नेहमीप्रमाणे तो आज सकाळी घरातून बाहेर पडला होता. त्याचा मृतदेह अशोक चौक परिसरातील व्हिवीको प्रोसेसच्या पाठीमागील सार्वजनिक शौचालयाच्या हौदातील पाण्याच्या आज दुपारी आढळून आला. जेलरोड पोलिसांनी मृतदेह बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयाकडे पाठवून दिला .यामागचे कारण अद्याप समजले नाही.

## तत्कालीन पोलिस अधीक्षक सातपुते यांना गृह विभागाचा पुरस्कार

✔ सुराज्य/सोलापूर

तत्कालीन पोलिस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी त्याच्या सेवा कालावधीत जिल्ह्यात अवैध हातभट्टी दारूची निर्मिती व विक्री बंद करण्यासाठी ऑपरेशन परिवर्तन' हा उपक्रम हाती घेतला होता. याची केंद्र सरकारच्या गृह विभागाने दखल घेतली आहे. याबद्दल त्यांना पुरस्कार जाहीर झाला आहे.



आपरेशन परिवर्तन'द्वारे सातपुते यांनी हातभट्टी दारू व्यवसाय करणारे ७३७ लोकांचे परिवर्तन करून कायदेशीर व्यवसाय सुरू केले होते. त्यांच्या या कामाची केंद्र सरकारच्या गृह विभागाकडून दखल घेतली आहे. गृह विभागाशी निगडित असलेल्या ब्युरो ऑफ पोलिस रिसर्च अँड डेव्हलपमेंट, गृह विभाग दिल्लीकडून संरक्षण दलातील नावीन्यपूर्ण कामासाठी सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येते. यावर्षी हा पुरस्कार तेजस्वी सातपुते यांना जाहीर केला आहे.

## चिंचोली काटी येथे गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : चिंचोली काटी (ता.मोहोळ ) येथे राहणाऱ्या सुरेश वसंत कुऱ्हाडे (वय ५५) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना काल बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

सुरेश कुऱ्हाडे याने काल सायंकाळच्या सुमारास घरातील छताच्या लाकडी वाशाला मफलरच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून त्रिंबक जाधव (जावई) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग, वकिलासह नऊ जणांवर गुन्हा


✔ सुराज्य/मोहोळ

रेशन दुकानला निघालेल्या अल्पवयीन मुलीला जवळ बोलावून तिच्याशी अश्लिल करत तिला उसात ओढत नेण्याचा प्रयत्न करित असताना हाताला हिसका देवून पळून गेली पुढील अनर्थ टळला परंतु नंतर त्या मुलीस व आत्यास येवून नऊ जणांनी मारहाण केली. ही घटना मोहोळ तालुक्यातील गावात सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत वकीलासह नऊ जणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहोळ तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन पीडित मुलगी १० ऑगस्ट रोजी रेशन दुकानात धान्य आणण्यासाठी जात होती. त्या रोडवर ज्ञानेश्वर येडगे या वकीलांचे घर आहे. रेशन दुकानात नंबर लावण्यासाठी गुरुवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास फिर्यादी महिलेने तिच्या अल्पवयीन भाचीला सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास पाठविले होते. पीडित मुलगी रडत घराकडे येत असल्याचे दिसले. जवळ आल्यानंतर तिला पाहिले असता तिचे अंगावरील कपडे फाटलेले होते. फिर्यादी महिलेने तिला याबाबत विचारले असता तीने सांगितले की ज्ञानेश्वर येडगे याने तिच्या हाताला पकडून धरून ओढून जवळ घेवून तिचे अंगावरील कपडे फाडून, तिच्याशी अश्लील चाळे करत ऊसात ओढून नेत असताना पिडीतेने हाताला हिसका देऊन पळून आली. घडलेली घटना रस्त्यातच तिच्या आत्याला सांगितली. त्यावेळी पीडीतेला समजावीत असतानाच तेथे वकिल ज्ञानेश्वर येडगे व त्याचे घरातील नातेवाईक व त्याचे सोबत इतर ३-४ अनोळखी लोक आले. त्यावेळी पुन्हा पीडित मुलीचा हात पकडून त्याची येडगे यांच्या कुटुंबातील लोकांनी व इतर चार अनोळखी लोकांनी फिर्यादी महिलेला व पीडित मुलीला लाथाबुक्यांनी मारहाण करून अश्लिल शिवीगाळ केली. फिर्यादी महिलेच्या गळयातील मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेले अशा आशयाची फिर्याद पीडित मुलीच्या आत्याने मोहोळ पोलीस ठाण्यात दिली असून त्यानुसार पोलिसांनी वकिल ज्ञानेश्वर येडगे, याच्यावर बाल लैगींक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल केला. अन्य ८ जणांच्या विरोधात मारहाण केल्याचा गुन्हा दाखल केला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अय्या, त्यांच्याकडे अजुन पावसाळा सुरु आहे!

कल्याण
140-59-450

मेन बाजार
239-40-569

### रात्री दीड वाजता दिले हमी पत्र

## मयत हणमंत काळे यांचा मृतदेह काळे कुटुंबीयांनी घेतला ताब्यात

✔ सुराज्य/सोलापूर

**चंद्रभागाबाई यलगुलवार शाळतील शिपाई हनुमंत विठ्ठल काळे यांनी शेततळ्यात उडी मारुन आत्महत्या केली होती .या प्रकरणात काळे यांच्या कुटुंबीयांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेल्या मागण्या रात्री उशिरा मान्य केल्या असून त्याबाबतचे लेखी पत्र जिल्हा परिषद शिक्षण विभागाने व शिक्षण संस्थेने संबंधित काळे कुटुंबियांना दिले.**



शिपाई पदासाठी शालार्थ आयडी न देता शिक्षण सेवक म्हणून शालार्थ आयडी दिल्याने त्या शिपायाचा पगार संस्थेने केला नाही. या प्रकरणात संबंधितांवर कारवाई व्हावी, मयताच्या पत्नीला तात्काळ अनुकंपा खाली नोकरीच घ्यावे, नोकरीवर असल्या पासूनचा मोबदला द्यावा अन्यथा मृतदेह उचलणार नाही या मागणीवर मृताचे वडील विठ्ठल काळे ठाम राहिले होते.

याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांना प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले होते.

त्यानुसार आव्हाळे यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी मारुती फडके, उपशिक्षणाधिकारी संजय जावीर, उपशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे या तीन अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमून अहवाल देण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यावरून रात्री दीड वाजेपर्यंत संबंधित घटनेचा सविस्तर अहवाल आल्यानंतर मृताच्या नातेवाईकांना पत्र देण्यात आले.

त्या पत्रात. श्री काळे हनुमत विठ्ठल यांच्या २०११ पासून कर्तव्याचा मोबादल्याबाबत शासनास वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करुन शासनाच्या निर्देशानुसार वेतन अदा करणेबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

त्यांची पत्नी श्रीमती सुनिता हनुमत काळे यांना संस्थेने अनुकंपा तत्वावर नियुक्ती करुन या कार्यालयास संस्थेने मान्यतेबाबतचा प्रस्ताव सादर केल्यानंतर शासननिर्णयानुसार तात्काळ कार्यवाही करणेत येईल. या प्रकरणात दोषी कर्मचारी व अधिकारी यांचेवर कारवाई करणेबाबतची बाब वरिष्ठ कार्यालय व शासनस्तरावरील आहे. असा उल्लेख आहे, तसेच संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने ही याबाबतचे पत्र काळे कुटुंबीयांना दिले आहे. या लेखी मिळालेल्या पत्रानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले.